मकर संक्रात
निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!

RNI No. MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

२ ऱ्या वर्षात पदार्पण

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१ ला ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.१५ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राजदूतांसह ५५ देशांमधील १०० प्रमुख होणार प्राणप्रतिष्ठेचे साक्षीदार

### कोरियाच्या महाराणींही आमंत्रित

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या :**

अयोध्येतील श्रीराम मंदिरात २२ जानेवारी रोजी होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी राजदूत आणि संसद प्रतिनिधींसह ५५ देशांतील सुमारे १०० प्रमुखांना आमंत्रित करण्यात आले आहे, असे जागतिक हिंदू फाउंडेशनचे संस्थापक आणि जागतिक अध्यक्ष स्वामी विज्ञानानंद यांनी रविवारी सांगितले.



रामलल्लांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अनेक मान्यवरांना बोलावले आहे. 'आम्ही कोरियाच्या महाराणींनाही आमंत्रित केले आहे, ज्या प्रभू श्रीरामाच्या वंशज असल्याचा दावा करतात,' असे स्वामी विज्ञानानंद यांनी सांगितले.

**कोणत्या देशातून येणार प्रमुख पाहुणे?**

अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेलारूस, बोत्सवाना, कॅनडा, कोलंबिया, डेन्मार्क, डॉमिनिका, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो (डीआरसी), इजिप्त, इथिओपिया, फिजी, फिनलँड, फ्रान्स, जर्मनी, घाना, गयाना, हाँगकाँग, हंगेरी, इंडोनेशिया, आयर्लंड, इटली, जमैका, जपान, केनिया, कोरिया, मलेशिया, मलावी, मॉरिशस, मेक्सिको, म्यानमार, नेदरलँड, न्यूझीलंड, नायजेरिया, नॉर्वे, सिएरा लिओन, सिंगापूर, दक्षिण आफ्रिका, स्पेन, श्रीलंका , सुरीनाम, स्वीडन, तैवान, टांझानिया, थायलंड, त्रिनिदाद आणि टोबॅगो, वेस्ट इंडीज, युगांडा, यूके, यूएसए, व्हिएतनाम आणि झांबिया आदी राष्ट्रांचे राजदूत आणि प्रमुखांना आमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## राम मंदिर प्राणप्रतिष्ठा; ८ दिवस अखंड रामनाम जप ११ यजमान करणार ४५ नियमांचे कठोर पालन

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्याराम मंदिरातील रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला आता अवघे आठ दिवस राहिले आहेत. अनेक ठिकाणी विविध धार्मिक गोष्टींचे पालन करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी अकरा दिवसांचे अनुष्ठान करत आहेत. मकरसंक्रांतीपासून अनुष्ठान, यम-नियम आणि संयम यांसह अनेक गोष्टी आचरणास सुरुवात होत आहे. राम मंदिराच्या भव्य सोहळ्यातील ११ यजमान आठ दिवस ४५ नियमांचे कठोर पालन करणार असून, अखंड रामनामाचा जप सुरू करण्यात येत आहे.



या नियमांचे पालन केल्याने यजमान दाम्पत्य धार्मिक विधीस सिद्ध होऊ शकतील. २२ जानेवारीला प्राणप्रतिष्ठा सोबतच यजमानांचे संकल्प व विधीही पूर्ण होतील. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला ११ दाम्पत्य यजमान म्हणून उपस्थित राहणार आहेत. मकरसंक्रांतीपासून सर्व यजमान प्रथम स्नान करून आठ दिवसांच्या विधीसाठीचा संकल्प करतील. श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टतर्फे सर्व यजमानांसाठी ४५ नियम व विधी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**अखंड रामनाम जप, जीवनशैली सात्विक**

ट्रस्टच्या अधिकाऱ्याने सांगितले की, यजमानांना आठ दिवस ४५ नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची शपथ घेण्यात येईल. नियमित पूजा आणि संध्या प्रार्थनेसोबतच आहार आणि जीवनशैली सात्विक ठेवत रामनामाचा सतत जप करावा लागेल. ट्रस्टचे खजिनदार स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी काशीचे अभ्यासक पं.गणेश्वर शास्त्री द्रविड यांच्याकडे यज्ञमान्यांच्या नियमांबाबत सल्ला मागितला होता. २२ जानेवारीला ८४ सेकंदांच्या अभिजित मुहुर्तावर होणारा हा सोहळा पूर्णपणे सनातनी आणि वैदिक परंपरांचे पालन करणार आहे.

दरम्यान, अयोध्येतील श्रीराम मंदिरात २२ जानेवारी रोजी होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी राजदूत आणि संसद प्रतिनिधींसह ५५ देशांतील सुमारे १०० प्रमुखांना आमंत्रित करण्यात आले आहे. सर्व व्हीव्हीआयपी विदेशी प्रतिनिधी २० जानेवारीला लखनौला येतील. त्यानंतर २१ जानेवारीला सायंकाळपर्यंत ते अयोध्येला पोहोचतील. धुके आणि हवामानामुळे या कार्यक्रमापूर्वी प्रतिनिधींना भारतात येण्याची विनंती करण्यात आली आहे, असे जागतिक हिंदू फाउंडेशनचे संस्थापक आणि जागतिक अध्यक्ष स्वामी विज्ञानानंद यांनी सांगितले. आम्ही कोरियाच्या महाराणींनाही आमंत्रित केले आहे, ज्या प्रभू श्रीरामाच्या वंशज असल्याचा दावा करतात, असे स्वामी विज्ञानानंद यांनी सांगितले.

## सुनावणी आटोपली, अहवाल देण्यास मनपा आयुक्तांची टाळाटाळ

### मनपा प्रशासनाकडून हायकोर्टाच्या आदेशाची अवमानना : श्री सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे प्रकरण

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महापालिका प्रशासनाच्या सहाय्यक संचालक नगररचना विभागाची परवानगी असतांना मनपा प्रशासनानेच बांधकाम बंद करण्याचे आदेश दिले. विशेष म्हणजे संबंधित बांधकाम व्यवसायिकाकडे बांधकामावर लावण्यात आलेला स्टे हटविण्या संदर्भातील हायकोर्टाचे ऑर्डर असताना देखील मनपा आयुक्तांनी सुनावणीला बोलावून हायकोर्टाच्या आदेशाची अवमानना केली. सुनावणी होऊन पंधरा दिवस लोटले, तरीही आयुक्त देविदास पवार मात्र अहवाल देण्यास टाळाटाळ करीत असल्याने मनपा प्रशासनाच्या कामकाजावरच ताशेरे ओढल्या जात आहे.



श्री सहकारी गृहनिर्माण संस्था येथे मुकूंद बर्गी यांच्या भूखंड क्रमांक १३ मधील सीट क्रमांक ३१ वर मनपा प्रशासनाने ३० ऑक्टोंबर रोजी इमारत बांधकाम आरंभ करण्यासंदर्भात प्रमाणपत्र दिले. सहाय्यक संचालक नगर रचना विभागाच्या वतीने बांधकाम परवानगी सुद्धा घेण्यात आली. विशेष म्हणजे या बांधकामा संदर्भात सर्व कागदपत्रांची पूर्तता मनपा प्रशासनाला करण्यात आली, असे असताना तथाकथित भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष असल्याचा बनाव करित शिल्पा पाचघरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या नावे सात नोव्हेंबर रोजी पाठविलेले पत्र मनपा प्रशासनाला दिले. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या पत्रावर आवक-जावक क्रमांक न बघता व ते पत्र मुख्यमंत्री कार्यालयातून आले का याची



शहानिशा न करताच मनपा प्रशासनाने त्या पत्राच्या आधारे बांधकामावर स्थगितीचे आदेश दिले. मनपा प्रशासनाच्या सहाय्यक संचालक नगररचना विभागाने बांधकामाकरिता परवानगी दिलेली असतांना केवळ दबावामुळे सुट्टीच्या दिवशी थांबवण्याचे आदेश दिले. इतकेच नव्हे तर मनपाच्या अभियंत्यांनी घटनास्थळी पोहोचून ते बांधकाम बंद करण्याचे सक्त निर्देश दिले. त्यामुळे संबंधित बांधकाम व्यवसायी सचिन रोडे यांनी हायकोर्टाचा दरवाजा ठोठावला. संपूर्ण कागदपत्राच्या आधारे हायकोर्टाने तात्काळ बांधकामाची स्थगिती हटवून बांधकाम सुरू ठेवण्याचे आदेश दिले तसेच या प्रकरणात मनपा प्रशासनाच्या वतीने उत्तर दाखल करण्याच्या सूचना दिल्या. हायकोर्टाची ऑर्डर मनपाला प्राप्त झाल्यानंतरही मनपा प्रशासनाने २ जानेवारीला सुनावणी घेतली. सुनावणीला हजर न झाल्यास तक्रारकर्त्याच्या तक्रारीप्रमाणे या प्रकरणात आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून नियमानुसार पुढील निर्णय देण्यात येईल अशी ताकीद देण्यात आल्याने नाईलाजास्तव मुकूंद बर्गी व सचिन रोडे सुनावणीला हजर झाले. त्यामुळे दोन जानेवारीला सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीमध्ये हायकोर्टाची ऑर्डर मनपा आयुक्तांना देण्यात आली. मनपा प्रशासनाला संपूर्ण प्रकरणाची माहिती असताना देखील हायकोर्टाच्या आदेशाची अवमानना करण्याचे धाडस करीत सुनावणी घेतली. सुनावणी होऊन पंधरा दिवस लोटल्यानंतरही मनपा आयुक्त देविदास पवार हे मात्र संबंधित बांधकाम व्यवसायिकाला अहवाल देण्यास टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे मनपा प्रशासन राजकीय दबावात काम करते का असा प्रश्न निर्माण होत आहे.

## पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संस्थेत सांस्कृतिक स्नेहसंमेलन उन्मेष २०२४ संपन्न

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम मोठे व्यासपीठ



**दि१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे नुकताच विद्यार्थ्यांच्या विविध क्लब च्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन 'उन्मेष २०२४' चे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, वादन, नाट्य, वेशभूषा स्पर्धा तसेच रांगोळी, मेहंदी, चित्र रेखाटन स्पर्धा व विविध खेळांमध्ये सहभागी होऊन स्नेहसंमेलनाचा आनंद द्वीगुणित केला. याच दरम्यान महाविद्यालयात पाच दिवशीय 'आनंद मेळाव्याचे' ' आयोजन देखील करण्यात आले होते यात विद्यार्थ्यांच्या वतीने विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथील स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम हे मोठे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन आपली कला यावेळी सादर केल्यात.

या वर्षी आंतरविभागीय नृत्य स्पर्धा हे या संमेलनाचे विशेष आकर्षण होते. यादरम्यान विद्यार्थ्यांना विविध उत्तेजनार्थ बक्षीसे सुद्धा प्रदान करण्यात आली.

स्नेहसंमेलनाचे यशस्वी नियोजन प्रा. सुमित सगणे, प्रा. पर्नल पावडे व डॉ संजीव सिंग यांनी विद्यार्थी क्लब च्या सहकार्याने केले. स्नेहसंमेलनाचा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी आयोजनाकरिता प्राचार्य डॉ. डी . टी . इंगोले, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर, स्टुडंट्स वेल्फेअर डीन डॉ एस. के. नंदा तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग होता. स्नेहसंमेलना दरम्यान विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचे मनोबल वाढविण्यात आले.

## राहुल नार्वेकरांच्या निकालाविरोधात ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव

**दि. १५ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी महत्त्वाच्या निकालाचं वाचन केलं. त्यानुसार, ठाकरे आणि शिंदे गटातील आमदार अनपेक्षितपणे पात्र ठरले असून खरी शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. याविरोधात कायदेविषयक लढाई लढण्याकरता त्यांनी आता सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात या



निकालाविरोधात याचिका दाखल केली असल्याचे वृत्त कायदेशीर वृत्तस्थळ असलेल्या लाईव्ह लॉने दिले आहे.

मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं. तसंच, मर्यादित कालावधीत याबाबतचा निकाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, या सुनावणीला जून महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्षात सुरुवात झाली. परंतु, ही सुनवाणी अखंडित होऊ शकली नाही. सुनावणीला वेग यावा आणि लवकर निकाल लागावा म्हणून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. त्यामुळे सर्वोच्च न्यायलयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पुन्हा मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, सुनावणी सुरू झाली. दोन्ही गटांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर याप्रकरणी ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागण्याची शक्यता होती. परंतु, राहुल नार्वेकर यांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला.

## रश्मी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'स्त्री शक्ती संवाद यात्रे'चं आयोजन

### ठाकरे गटाच्या नेत्यांसोबत आता पक्षाची महिला आघाडी प्रचाराच्या रिंगणात

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

सध्या राज्यात लोकसभा निवडणुकांची तयारी जोरदार सुरु करण्यात आलीये. त्याच पार्श्वभूमीवर आता ठाकरे गटाची महिला आघाडी देखील प्रचाराच्या रिंगणात उतरणार असल्याची माहिती समोर येतेय. पहिल्यांदाच रश्मी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'स्त्री शक्ती संवाद' यात्रा आयोजित करण्यात आलीये. मंगळवार १६ जानेवारी रोजी विदर्भापासून या यात्रेची सुरुवात होणार आहे. यामध्ये विदर्भातील महिलांशी संवाद साधला जाईल.



पक्षाच्या उपनेत्या विशाखा राऊत, किशोरी पेडणेकर, ज्योती ठाकरे, संजना घाडी,राजूल पटेल, शितल देवरुखकर आणि रंजना नेवाळकर संपूर्ण विदर्भातील विधानसभेचा सखोल आढावा घेणार आहेत. उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार आणि रश्मी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाकरे गटाची स्त्रीशक्ती संवाद यात्रा विदर्भातून सुरू होणार आहे. राज्यात सध्या अंगणवाडी सेविकांचा प्रश्न हा प्रलंबित आहे. त्याच पार्श्वभूमीवर महिला आघाडीकडून महिला बचत गट, अंगणवाडी सेविका आणि इतर महिलांशी संवाद संबंधित विषयांवर भाष्य या संवाद यात्रेच्या निमित्ताने शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडीकडून केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे अमरावती, यवतमाळ वाशिम, रामटेक लोकसभा मतदारसंघात या महिला आघाडीकडून दौरा केला जाईल.

## संपादकीय ......

# चीनच्या नादी लागून मालदीवचा भारतद्वेष आत्मघातकी ठरणार

मालदीवचा अर्थ आहे द्विपांचा समूह किंवा द्विपांची माळ. गेली काही वर्ष या देशाला हिंद महासागर हळुहळू कवेत घेतोय. हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका या छोट्याशा देशाला बसतोय. जागतिक तापमान वाढीमुळे आत्ताच्या गतीने समुद्राची पातळी वाढत राहिली, म्हणजे समुद्राची पातळी १० ते १०० सेंटीमीटरने वाढली तरी साल २१०० पर्यंत म्हणजे येत्या ७६ वर्षात संपूर्ण मालदिव समुद्रात बुडून गेलेलं असेल अशी भीती वर्ल्ड बँकेनं व्यक्त केली आहे.

येत्या २६ वर्षात ८० टक्के मालदीव पाण्याखाली बुडेल असा अंदाज आहे. म्हणजे २०५० सालापर्यंत मालदीव राहण्यायोग्य नसेल. याकडे जगाचं लक्ष वेधण्यासाठी मालदीवने समुद्रात खोलवर जाऊन कॅबिनेटची बैठक सुद्धा घेतली होती. हवामान बदलासोबतच्या लढ्यासाठी त्यांना अब्जावधी डॉलर्सचा निधी आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मिळत असतो. मात्र या देशाचा सर्वात मोठा स्त्रोत राहिला आहे तो म्हणजे पर्यटन उद्योग.

या देशाची लोकसंख्या फक्त पाच सहा लाखाच्या आतबाहेर, म्हणजे कोल्हापूर शहराच्या लोकसंख्येपेक्षाही कितीतरी कमी. नवी मुंबईच्या छोट्याशा खारघर नोडपेक्षाही कमी. त्यातले ४ ते ५ टक्के म्हणजे साधारण २५ हजार अनिवासी भारतीय. इथे दरवर्षी देशाच्या लोकसंख्येच्या तिप्पट चौपट परदेशी पर्यटक फिरायला येतात, त्यातही भारतीयांचा वाटा सर्वात जास्त. मालदीव पर्यटन मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षी म्हणजे २०२३ साली जवळपास १८ लाख परदेशी पर्यटकांनी मालदीवला भेट दिली, त्यात सर्वात जास्त १२ टक्के म्हणजे २ लाख १० हजार पर्यटक हे भारतीय होते.

आंतरराष्ट्रीय मंचावर हवामान बदलापासून ते सागरी संरक्षणापर्यंत हा देश भारताच्या खांद्याला खांदा लावून उभा असायचा. नैसर्गिक आपत्ती असो की आरोग्य, शिक्षण, इन्फ्रास्ट्रक्चर असो भारताने सुद्धा वेळोवेळी सर्वात आधी सर्व प्रकारची मदत करत, सख्ख्या शेजाऱ्याची आणि पक्क्या मोठ्या भावाची भूमिका पार पाडलीय. मोदी सरकारने २०१८ साली मालदीवला साडे आठ हजार कोटी रुपयांची आर्थिक मदत केली होती.

अंतर्गत यादवी असो की त्सुनामी असो, भारताने सतत मदतीचा हात पुढे केला आहे. कोरोना काळातही औषधांपासून ते कोविड लसी पुरवण्यापर्यंत भारताने आपल्या छोट्या मित्राची कायम मदतच केली. दोन्ही देशातील आयात निर्यात व्यापार साधारण ४ ते ५ हजार कोटींवर पोहोचलाय. २०२२ साली दोन्ही देशात भारतातून मालदीवला होणारी निर्यात ४ हजार ११७ कोटींची होती तर मालदीववरुन केलेली आयात साधारण १०० कोटींची.

मात्र कुठेतरी चीनी माशी शिंकली आणि मालदीवमध्ये भारताचा विरोध करणारा आणि चीन धार्जिणे धोरण राबवणारा विचार रुजू लागला. इस्लामिक स्टेटच्या जिहादी अतिरेकाला समर्थन देणाऱ्यांची आणि त्यासाठी सीरियाला जाणाऱ्यांची संख्याही इथे वाढू लागली. गेल्या नोव्हेंबरमध्ये निवडणुकीत खछ्ऊख- जणढ मोहीम राबवणाऱ्या भारत विरोधी मोहम्मद मुईजच्या पक्षाला तिथल्या जनतेने सत्तेत आणलं आणि भारत द्वेष नव्या मालदीव सरकारचं नवं धोरण बनतंय की काय अशी स्थिती निर्माण झाली.

मालदीवमध्ये आपत्कालीन विमान, हेलिकॉप्टर, रडार सेवा देण्यासाठी भारतीय सेनेच्या ७७ जवानांची, तंत्रज्ञाची टीम तैनात आहे. त्याला विदेशी सैन्य असं प्रोजेक्ट केलं गेलं. त्यांना भारताने परत बोलवावं असं मुईज यांचं धोरण आहे आणि त्याला भारताने मान्यताही दिली आहे. कारण त्यात भारतापेक्षा एक देश म्हणून मालदीवचा जास्त तोटा होणार आहे. कारण या तुकडीने आपतकाळात किती मदत केली याचा पाढा मुईज यांनीही वाचून दाखवला आहे. मात्र चीनच्या दबावासमोर झुकलेल्या मोहम्मद मुईज आणि त्यांच्या सरकारचा भारत द्वेष वाढतच गेला. त्या नादात वाहवत जात मालदीव सरकारमधील मंत्र्यांनी लक्षद्वीप दौऱ्यातील फोटोंवरुन पंतप्रधान मोदींचाही अपमान केला. त्यात नंतर काही नेटीझन्सचीही भर पडली.

आपण मित्र देशाच्या पंतप्रधानाचा अपमान तर करतो आहोतच पण त्यासोबत त्या देशाचा आणि कोट्यवधी भारतीयांचाही एक प्रकारे अपमान करतो आहोत याचा विसर या मंडळींना पडला. काही जुन्या, विचारी लोकांनी, नेत्यांनी सबुरीचा सल्ला दिला पण भारत द्वेषाच्या आहारी गेलेल्यांना त्याकडे लक्ष द्यावे वाटले नाही हे दुर्दैव. या निमित्ताने भारतातच पर्यटनासाठी किती मोठी नयनरम्य ठिकाणं आहेत आणि पर्यटनाला किती मोठी संधी आहे याची चर्चा सुरु झाली. लक्षद्वीपपासून ते सिंधुदुर्गापर्यंत एक एक ठिकाणं शेअर केली गेली. अतिथी देवो भव या वैश्विक मंत्राची आठवणही काढलीय.

लक्षद्विपमध्ये मोठ्या प्रमाणात सोयीसुविधा वाढवण्यावर सरकारने भर दिला आहे. आपल्या जवळ, अवतीभवती इतकी चांगली ठिकाणं असताना आपल्या देशाचा दुस्वास करणाऱ्या देशात जाण्याआधी भारतीय पर्यटक दहादा विचार करतील. सध्या तरी या सगळ्या घडामोडींचा सध्यातरी फक्त चीनला अल्पकालीन फायदा होईल असं दिसत आहे. पण मालदीवचं दीर्घकालीन नुकसान आहे हे नक्की.

नेपाळ असो, श्रीलंका असो किंवा पाकिस्तान असो जे जे देश चीनच्या नादाला लागले, चीनच्या कर्जाच्या विळख्यात अडकले, त्यांची अवस्था चीनने काय केली हे वेगळं सांगायला नको. मालदीववर सुद्धा आज ना उद्या ती वेळ नक्की येणार. त्याआधीच नवे राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या सरकारमधील भारतद्वेषी मंत्र्यांना उपरती होईल अशी अतिशय धूसर आशा करायला काय हरकत आहे.

# पुढील ३ दिवस थंडीची लाट!

## हवामान खात्याने वर्तवला अंदाज

**दि. १५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली–** देशात आता थंडीचा पारा आणखी घसरणार आहे. पुढील काही दिवसात देशातील तापमानात घट होताना पाहायला मिळणार आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस उत्तरेकडे थंडीची लाट पाहायला मिळणार आहे. पुढील काही दिवस उत्तरेकडील भागात थंडीतून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा भागात दाट धुक्याची चादर पसरली आहे. पहाटेच्या वेळेस दाट धुके आणि गारठ्यामुळे सकाळी घरातून बाहेर पडणं कठीण झालं आहे.



मध्य आणि पूर्व भारतात पुढील ४८ तासात तापमानात घट होणार आहे. पुढील दोन दिवसात मध्य आणि पूर्व भारतातील तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसची घट होणार असल्याचं आयएमडीने म्हटलं आहे. राजस्थान, दिल्लीमध्ये थंडीची स्थिती कायम राहणार असल्याचं हवामान विभागाने (खचऊ) म्हटलं आहे. १६ जानेवारीपर्यंत नवीन वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय होण्याची शक्यता आहे, त्यामुळे देशातील हवामानात पुन्हा एकदा बदल पाहायला मिळण्याचा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे.

**काश्मीर खोऱ्यात बर्फवृष्टीची शक्यता–** आज उत्तरेकडील राज्य पंजाब, हरियाणा, चंदीगड, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थान या भागात दाट धुके पसरण्याची शक्यता आयएमडीने वर्तवली आहे. गेल्या २४ तासात जम्मू-काश्मीर लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुजफ्फराबाद या भागात बर्फवृष्टी पाहायला मिळाली. दरम्यान पुढील ४८ तासात काश्मीर खोऱ्यात अनेक ठिकाणी पाऊस आणि बर्फवृष्टीची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. सध्या डेहराडूनसह मैदानी भागात दाट धुक्यापासून दिलासा मिळण्याची चिन्हे नाहीत. बद्रीनाथ धाम आणि हेमकुंड साहिबच्या पर्वतीय भागात झालेल्या हिमवृष्टीमुळे सखल भागात थंडीची लाट आली आहे. कोरडे हवामान आणि थंड वाऱ्याने संपूर्ण राज्यात कहर केला आहे. सकाळी नऊ वाजेपर्यंत धुके असून त्यामुळे हाडे गोठवणारी कडाक्याची थंडी पाहायला मिळत आहे. दहा वाजल्यापासून हलका सूर्यप्रकाश आल्याने तापमानात किंचित वाढ होताना दिसत आहे. त्यानंतर संध्याकाळ जवळ आली तसतसे थंडी पुन्हा एकदा वाढते.

उत्तर भारतात पुढील दोन ते तीन दिवस दाट ते जास्त दाट धुक्याची चादर पाहायला मिळणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तर प्रदेश, दिल्ली या भागात १७ डिसेंबरपर्यंत पहाटे आणि रात्री दाट धुक्याची चादर पाहायला मिळणार आहे.

# काँग्रेसचे शंकराचार्यांविषयी प्रेम पुतना मावशीचे! हिंदू विरोध हाच उद्देश !



आपल्या हिंदू विरोधी धोरणातून काँग्रेसने २२ जानेवारीला श्रीरामललाच्या पुनर्प्रतिष्ठापनेचे निमंत्रण नाकारले. सोबतच कधीही हिंदू संत महंतांना महत्व न देणाऱ्या काँग्रेसने सध्या चार शंकराचार्यांच्या नावाचा गैरवापर करून हिंदू समाजाच्या अभूतपूर्व उत्साहावर विरजण टाकण्याचा प्रयत्न चालवलेला आहे.काँग्रेसला दोन शंकराचार्यांनी आयते कोलीत दिले. त्या दोघांच्या प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर फिरवून काँग्रेसने उर्वरित दोन शंकराचार्यांच्या नावाने देखील अपप्रचार चालवला आहे. या चारही शंकराचार्यांचा काँग्रेस सध्या आदरपूर्वक उल्लेख करते आहे. जामा मशिदीच्या शाही इमामाच्या फतव्यावर राजकारण करणाऱ्या काँग्रेसला या दोन - चार दिवसात शंकराचार्यांचा फार पुळका आलेला आहे. काँग्रेसचा हा आदरभाव पाहता त्यांनी देशाला एक शब्द दिला पाहिजे. यापुढे कुठल्याही शंकराचार्यांनी केलेल्या प्रत्येक विधानाला एवढ्याच आदराने काँग्रेस सन्मान देईल आणि कुठल्याही परिस्थितीत त्यांचा शब्द खाली जाऊ देणार नाही, हे वचन काँग्रेसने देशाला दिले पाहिजे. काँग्रेसला सोयीचे असेल तर शंकराचार्यांविषयी आदर आणि हिंदू हिताचा विषय असेल तर शंकराचार्य धर्मांध, असे चालणार नाही. जेव्हा काही शंकाराचार्य श्रीरामजन्मभूमी मुक्त करा म्हणून मागणी करत होते, तेव्हा काँग्रेसला शंकराचार्य पूजनीय नव्हते का ? ज्या शंकराचार्यांचा काँग्रेस सध्या उदो उदो करते आहे, त्यांनी यापूर्वी केलेल्या महत्वपूर्ण मागणीलाही काँग्रेसने आपले समर्थन जाहिर करावे. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झालेली असल्याने सर्व मुसलमानांना पाकिस्तानात पाठवायला हवे, हे त्यांचेच विधान आहे. काँग्रेसने या विधानाविषयी देखील स्वतःचे धोरण देशाला सांगितले पाहिजे.एरवी हिंदूंची प्रतारणा करणाऱ्या काँग्रेसला एकाएकी शंकराचार्य वंदनीय वाटतात, या मागे कुठली गोम आहे हे न समजण्याएवढा हिंदू समाज दुधखुळा नाही. मुळात दोन शंकराचार्यांनी २२ जानेवारीला होणाऱ्या कार्यक्रमावर आक्षेप घेणारी प्रतिक्रिया दिली आहे. मात्र, उर्वरित दोन शंकराचार्यांनी कुठलाही आक्षेप घेतलेला नाही. उलट कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीरामललाच्या पुनर्प्रतिष्ठापने बद्दल आनंद व्यक्त केला आहे. त्या दोघांच्या नावाने अपप्रचार केला जात आहे म्हणून त्यांनी लिखित स्वरूपात खुलासा देखील केला आहे. काँग्रेसला रामाबद्दल प्रेम नाही. उलट आकसच आहे. हिंदूबद्दल तर कवडीचीही आस्था नाही. मग त्यांना एकाएकी दोन ✻शंकराचार्य एवढे प्रिय का झाले, याचे उत्तर स्पष्ट आहे. श्रीरामजन्मभूमी मंदिराच्या विरोधात लावलेला सूर काँग्रेसला प्रिय आहे. त्यामुळेच व्हॅटिगनचे आदेश पाळणारे एकाएकी शंकराचार्यांचा गवगवा करायला लागले आहेत.✻एखाद दुसऱ्या शंकराचार्याने वेगळी भूमिका मांडणे काही नवे नाही. श्रीरामजन्मभूमी आंदोलन शिखरावर असताना देखील असे अपवाद जाणीवपूर्वक समोर आणले गेले होते. देशातील हिंदूंना एक गोष्ट समजते, श्रीरामजन्मभूमी मंदिरासाठी देशातील बहुतांश साधू, संत, कीर्तनकार, प्रवचनकार, महंत, धर्मचार्य संघटित झाले आहेत. भाषा, पूजा पद्धती, संप्रदाय, पंथ असे भेद न बाळगता हे राष्ट्र मंदिर उभे करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. अभूतपूर्व उत्साह आहे. यांच्यापैकी कोणाचाही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्यावर आक्षेप नाही. मोदीजी हे राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या श्रीरामाचे भक्त आहेत. एकेकाळी देशाचे पंतप्रधान सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार आणि भगवान शंकराची प्राणप्रतिष्ठा नाकारत होते. आज निधड्या छातीचे पंतप्रधान श्रीरामललाच्या पुनर्प्रतिष्ठापनेसाठी येणे, ही जगातील सर्व हिंदूंसाठी अभिमानाची बाब आहे. श्रीरामजन्मभूमी मंदिराचा कार्यक्रम हा एकमताने ठरला आहे. मुळात एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की हिंदू समाज विरोधात लागलेला कोणाचाही सूर ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही. 'अवध मे राम आये है' म्हणत तो आपल्या घरी व गावात दिवाळी साजरी करण्याच्या कामी लागला आहे. हिंदू समाजासमोर एक चित्र स्पष्ट आहे. भारताला गुलामीत ठेवण्यासाठी हिंदू समाजातील 'राम' घालवण्याच्या मानसिकतेतून श्रीरामजन्मभूमी बळकावण्यात आली होती. ते गुलामगिरीचे चिन्ह पुसून शेकडो वर्षांची तपश्चर्या फळाला येते आहे. राम आणि राष्ट्र ही सांगड पक्की आहे. स्वाभिमानाची ही लढाई आहे. आत्मसन्मानाची लढाई आहे. आत्मसन्मान गमावलेला समाज समर्थ राष्ट्र घडवू शकत नाही. राष्ट्र समर्थ झाले तरच हिंदूंचा सन्मान, संत - महंतांचा सन्मान देखील कायम राहणार आहे. शास्त्रावर चर्चा करायची ही वेळ नाही. मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाने देखील धर्माचे पालन करण्यासाठी वाली वध करताना शास्त्राचा विचार केला नव्हता. प्रभु श्रीरामाने रामेश्वरम येथे समुद्राच्या काठावर रेतीवर ज्योतिर्लिंगाची प्राणप्रतिष्ठा केली होती. मंदिर बांधलेले नव्हते. पुढे मंदिर बांधले गेले तेव्हा ज्योतिर्लिंग तिथेच होते. काँग्रेसने ठोकलेल्या कुलुपात सळाखांच्या मागे रामललाने राहायचे. नंतर तंबूत राहायचे. पण अतिशय सुंदर तयार गर्भगृहात राहायचे नाही, हे शास्त्र आम्हाला शिकवू नका. श्रीरामाचे अस्तित्व नाकारणारे शंकराचार्यांचे आणि शास्त्राचे दाखले देत आहेत. काँग्रेसने शास्त्र सांगावे, या पेक्षा मोठा दैव दुर्विलास तो कोणता !मोदीद्वेषाने पछाडलेली काँग्रेस चीनच्या मांडीवर जाऊन बसते. मोदींचा विरोध करता करता ते देशविरोधी व आता रामविरोधी भूमिका घ्यायला देखील मागेपुढे पाहत नाहीत, हा अनुभव आहे.श्रीरामजन्मभूमी मुक्तीसाठी हिंदूंनी त्र्याहत्तर वेळा शास्त्र नाही शस्त्र हातात घेतले. रामभक्तांनी आपल्या रक्ताने या श्रीरामजन्मभूमीचे सिंचन केले आहे. प्रचंड शारीरिक व मानसिक अत्याचार सहन केले आहेत. प्रचंड संघर्षातून हा ऐतिहासिक शुभ प्रसंग हिंदूंच्या जीवनात आलेला आहे. काँग्रेसला शंकराचार्यांविषयी उदभवलेले प्रेम हे पुतना मावशीचे आहे, हे त्या दोन मान्यवरांना कळत नाही हे मात्र, हिंदूंचे दुर्दैव आहे.



**शिवराय कुळकर्णी**
**प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र**
**९८८१७१७८२७**




## जास्त प्रथिनांचे सेवन केल्याने शरीराला होते दिवसात किती प्रोटीन्स घ्यावेत?

**दि. १५ विदर्भ प्रजासत्ताक –**आजकाल लोक बॉडीबिल्डिंग आणि फिटनेसकडे (ऋळीं-पशीी ढळीं) लक्ष देत आहेत. यासाठी लोक जिममध्ये जाऊन तासनतास घाम गाळत आहेत. अशा परिस्थितीत, स्नायू लवकर वाढवण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी बरेच लोक उच्च प्रथिनयुक्त आहाराचा अवलंब करतात. परंतु जास्त प्रमाणात प्रथिनांचे सेवन केल्याने त्यांना त्यांचे आरोग्य बिघडवण्याचे परिणाम भोगावे लागू शकतात याची जाणीव बहुतेकांना नसते. प्रथिने शरीरातील पेशींची निर्मिती आणि देखभाल करण्यास मदत करतात. आपले स्नायू मजबूत ठेवणे महत्वाचे आहे परंतु असे म्हटले जाते की कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हानी करतो. दररोज किती ग्रॅम प्रथिने घ्यावीत आणि जास्त प्रमाणात घेतल्याने कोणते नुकसान होऊ शकते हे जाणून घेऊया.

**दररोज किती प्रथिने घ्यावीत?**

एक निरोगी व्यक्तीला दररोज त्याच्या शरीराच्या वजनाच्या प्रति किलोग्रॅम ०.८ ग्रॅम प्रथिने आवश्यक असतात. उदाहरणार्थ, तुमचे वजन ६० किलो असल्यास, तुम्ही दररोज किमान ४८ ग्रॅम (६० ु ०.८) प्रथिने खावीत. तथापि, गर्भधारणेदरम्यान आणि बाळाच्या विकासादरम्यान प्रथिनांची आवश्यकता जास्त असू शकते. तसेच बॉडीबिल्डिंगमध्येही प्रोटीनचे सेवन वाढवता येते. पण लक्षात ठेवा, जास्त प्रमाणात प्रथिने खाल्ल्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात.

**जास्त प्रथिने खाण्याचे तोटे**

**मूत्रपिंडावर दबाव पडतो**

जेव्हा आपण प्रथिने जास्त प्रमाणात वापरतो, तेव्हा त्याचा आपल्या किडनीवर अतिरिक्त दबाव पडतो. किडनीचे काम शरीरातून टाकाऊ आणि विषारी पदार्थ काढून टाकणे आहे.जेव्हा आपण जास्त प्रथिने खातो,




तेव्हा किडनीला ते अतिरिक्त प्रोटीन देखील फिल्टर करावे लागते. यामुळे त्याच्यावर दबाव येतो आणि त्याला अधिक काम करावे लागते. असेच जास्त काळ चालू राहिल्यास किडनी कमकुवत होते.

**हाडांचा कमकुवतपणा** – अति प्रथिने शरीरात आम्लता वाढवते ज्यामुळे हाडांमधून कॅल्शियम बाहेर पडतो, यामुळे ऑस्टियोपोरोसिस किंवा हाड कमजोर होतात.

**वजन वाढणे**

अतिरिक्त प्रथिने शरीरात चरबीच्या रूपात जमा होतात आणि वजन वाढू शकते.अशाप्रकारे प्रथिने जास्त प्रमाणात घेतल्यास वजन वाढू शकते आणि लठ्ठपणाची समस्या उद्भवू शकते.

**पचनाच्या समस्या**

अति प्रथिनांमुळे पोट फुगणे, अतिसार, अपचन यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. एखाद्याने जास्त प्रथिने घेणे टाळावे..

# रेल्वे थांब्यासाठी महाव्यवस्थापकांना घालणार घेराव

## चांदूररेल्वेच्या रेल रोको कृती समितीची पत्रकार परिषदेतून माहिती

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक चांदूरेल्वे –** चांदूररेल्वे स्थानकावर कोरोनापूर्वी असलेली जबलपूर-अमरावती सुपरफास्ट एक्स्प्रेस आणि लोकमान्य टर्मिनल शालिमार एक्स्प्रेसचा थांबा पूर्ववत करण्यात यावा, या मागणीकरिता चांदूरेल्वे तालुकावासी १९ जानेवारीला धामणगाव रेल्वेस्टेशनवर जाऊन रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना (जी. एम.) घेराव घालणार आहेत. रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना (जी. एम.) घेराव घालण्याचा निर्णय आम्ही सर्व पक्षीय, सर्व संघटना, मंडळे व तालुका वासीयांच्या १३ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीतून घेतला आहे, अशी माहिती रेल रोको कृती समितीतर्फे रविवारी स्थानिक विश्रामगृहावर झालेल्या पत्रकार परिषदेतून देण्यात आली.यावेळी रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, आम आदमी पार्टीचे नेते राजाभाऊ भैसे, माजी न. प. सभापती मेहमूद हुसैन, भाकपचे नेते विनोद जोशी, माकपचे नेते रामदास कारमोरे, भाजपचे माजी नगरसेवक बच्चू वानरे, काँग्रेसचे




माजी नगरसेवक प्रफुल्ल कोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव प्रा. रवींद्र मेंढे, शिवसेना (ठाकरे गट) नेते बंडू यादव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रशांत शिरभाते, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ता गुड्डू बजाज, विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष हर्षल वाघ, संजय डगवार, मनोज महाजन, चरण जोल्हे, महादेव शेंद्रे, अंकुश जोशी, विनोद लहाने यासह अनेकांची उपस्थिती होती. सोबतच रेल रोको कृती समितीला रेल्वे सल्लागार समितीचासुद्धा पाठिंबा आहे.ही मागणी संपूर्ण तालुकावासीयांचीच असल्यामुळे जास्तीत जास्त नागरिक यात सहभागी होणार, अशी अपेक्षा असल्याचे रेल रोको कृती समितीने पत्रकार परिषदेत म्हटले आहे.

### खासदार, आमदारांनीही सहभागी व्हावे

चांदूररेल्वेवासींची रेल्वे थांब्याची मागणी अनेक दिवसांची आहे. १९ जानेवारीच्या घेराव आंदोलनात नागरिकांसमवेत खासदार रामदास तडस, आमदार प्रताप अडसड यांनीही सहभागी होऊन रेल्वे अधिकाऱ्यांना जाब विचारावा, अशी अपेक्षा जनतेची आहे.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# 'व्ही.एम. व्ही.' च्या संचालक पद नियुक्तीत राजकीय हस्तक्षेप?

## सेवाजेष्ठता डावलून मर्जी सांभाळनाऱ्याना प्राधान्य

## राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचा कारनामा

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** शहरातील नामांकित शासकीय शिक्षण संस्था असलेल्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेत गेल्या काही वर्षापासून राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शिक्षण क्षेत्रातील कार्याचे नुकतेच शतक पूर्ण करणाऱ्या या संस्थेला राजकीय वाळवी लागल्याने गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी उभी असलेली ही संस्था धोक्यात आली आहे. संस्थेचा कारभार आपल्या मर्जीनुसार चालावा यासाठी संस्थेचे संचालक पद आपल्याच हातात असावे, अशी मनीषा बाळगून असलेल्याकडून सर्व नियम डावलून आपल्याच लोकांना संचालक पदावर नियुक्त्या दिल्या जात असल्याने शैक्षणिक वर्तुळात राज्याच्या उच्च शिक्षण विभागाबद्दल प्रचंड रोष निर्माण होत आहे.राज्याच्या उच्च शिक्षण विभागाच्या संचालक पदी कार्यरत असलेले डॉ. धनराज माने यांनी विभागातील घाण साफ

### संस्थेचे अधीक्षक अनभिज्ञ कसे?

संचालक डॉ. अंजली देशमुख यांनी त्यांच्या रिक्त पदाचा कार्यभार डॉ. श्रीकृष्ण यावले यांच्याकडे सोपविण्याकरिता शिक्षण संचालकांना पत्र दिले. यासंदर्भात संस्थेचे अधीक्षक मानकर यांच्याशी संपर्क करून त्यांना याबाबत माहिती विचारली असता संस्थेतून अशा प्रकारे कोणाचेही नाव शासनास कळविण्यात आले नसल्याचे सांगितले. त्यामुळे तत्कालीन संचालकांनी शासनास पाठवलेल्या पत्रापासून अधीक्षक अनभिज्ञ कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

करण्याचा प्रयत्न सुरू केला असता त्यांना या पदावरून हटवून डॉ.शैलेंद्र देवळणकर यांना त्यांच्या पदावर नियुक्ती देण्यात आली. अनुभवी व सेवाजेष्ठता डावलून यांच्यावरच शासन एवढे मेहरबान का? असा प्रश्न यानिमित्ताने पुढे आला आणि उलट सुलट चर्चा सुरू झाली. राज्य पातळीवर राबविलेला हाच कित्ता स्थानिक पातळीवरही राबविण्यात येत आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्या मर्जीतील तसेच आपल्याला लाभ देऊ शकेल अशा व्यक्तींना संचालक पदावर पेरण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार नुकताच व्ही. एम. व्ही.च्या संचालक नियुक्तीवरून समोर आला आहे.शहरातील मध्यवस्तीत एका विस्तीर्ण परिसरात कार्यरत असलेल्या



शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेच्या संचालिका डॉ.अंजली देशमुख या नियत वयोमानानुसार ३० नोव्हेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यामुळे रिक्त झालेल्या संचालक पदावर अनुभवी, संपूर्ण विभागाची माहिती असलेल्या तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे सेवाजेष्ठ अध्यापकाकडे हे पद सोपविणे आवश्यक होते. त्यानुसार डॉ.देशमुख यांनी संस्थेमध्ये उपलब्ध माहितीच्या आधारे संस्थेतील भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.श्रीकृष्ण यावले यांच्याकडे पदाचा कार्यभार सोपविण्या करिता २० नोव्हेंबर २०२३ रोजी शिक्षण संचालकांना पत्र दिले. त्यानूसार डॉ. यावले यांची या पदावर वर्णी लागणार असे दिसत असतानाच अचानक अमरावती विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ.काकडे यांच्याकडे संचालक पदाचा प्रभार देण्यात आला. डॉ.काकडे हे सहसंचालक पदाचा कार्यभार सांभाळून संचालक पदाला किती न्याय देणार असा प्रश्न उपस्थित होत असला तरी या नियुक्तीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. संस्थेत पात्र व्यक्ती असताना त्यांना डावलून अशा नियुक्त्या दिल्या जात असल्याने शैक्षणिक वर्तुळात शासनाच्या धोरणाविरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

---

# मालमत्ता करवाढीविरोधात त्रस्त नागरिक एकवटले

## शुक्रवारी काँग्रेस कार्यकर्ते नागरिक देणार धडक

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** अमरावती महानगर पालिकाप्रशासनाने मालमत्ता करात केलेल्या प्रचंड दरवाढीविरोधात काँग्रेस पक्षाद्वारे माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांचे नेतृत्वात ही दरवाढ रद्द करण्याकरिता अंतिम लढाईचा निर्धार करण्यात आला आहे. १९ जानेवारी रोजी पाचही मनपा झोन कार्यालयांवर हल्लाबोल आंदोलनाची हाक काँग्रेसने दिली आहे.

मनपा झोन क्रमांक एक रामपुरी कॅम्पअंतर्गत समाविष्ट परिसरातील आंदोलनाची रूपरेषा आखण्याकरिता कठोरा नाका, व्ही. एम. व्ही. परिसरातील उज्वल कॉलनी, विद्युतनगर येथे नियोजन बैठक शनिवारी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, काँग्रेस



शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब भुयार, माजी नगरसेवक अनिल माधोगढ़िया, प्रशांत महल्ले, धीरज हिवसे, गोपाल धर्माळे, स्वाती जावरे यांच्या उपस्थितीत पार पडली. वाढीव मालमत्ता कराविरोधात बैठक असून, परिसरातील नागरिकांनीसुद्धा उपस्थित राहण्याचे पदाधिकारी आवाहन स्थानिक कार्यकर्त्यांद्वारे करण्यात आले होते.

---

# एकाच रात्री बिझिलँड मधील दहा दुकाने फोडली

## ६५ हजारांची रोकड लंपास, सीसीटीव्ही फुटेज वरून चोरट्यांचा शोध सुरू

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** एकाच रात्रीत चोरट्यांनी तब्बल दहा दुकाने फोडून रोकड लंपास केल्याची घटना शनिवारी मध्यरात्री घडली. दहा दुकानांपैकी आठ दुकानांमधून ६५ हजार रुपयांची रोकड चोरट्यांच्या हाती लागली.

नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन श्वानपथकाद्वारे चोरट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.घटनेत तीन जणांचा समावेश असून या प्रकारामुळे मात्र व्यापारीवर्गात दहशत निर्माण झाली आहे. शनिवारी मध्यरात्री ३ वाजताच्या सुमारास तीन चोरटे बिझिलँड मधील मागील बाजूने प्रवेश करून आतमध्ये शिरले.साया फॅशन, राजतीलक,प्रीतम फॅशन,हार्दिक अनेक्स, साई कृष्ण अप्रल,ज्योती पाईप, व्यंकटेश बॅग्स, श्याम पारवा,साहेब कोटसूट, महाराजा फॅशन, बिझिलँड कार्यालयाची शटर लोखंडी रॉड ने वाकवून चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला यामध्ये आठ दुकानांमधून ६५



हजार रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केली. सकाळी व्यापारी जेव्हा दुकानात पोहचले तेव्हा त्यांना दुकानाचे शटर वाकलेले दिसले त्यामुळे त्यांनी तातडीने नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रवीण काळे यांच्याशी संपर्क साधून त्यांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला मात्र त्यानंतर उर्वरित नऊ दुकानदारांनी सुद्धा तक्रार केल्याने मोठी चोरी झाल्याचे निदर्शनास आले व पोलिसांनी श्वास पथक बोलावून चोरांचा सुगावा घेण्याचा प्रयत्न केला.दुकानाजवळ लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरामध्ये तीन जणांचे चेहरे कैद झाले असून त्या अनुषंगाने पोलिसांनी तपासाची चक्रे आरंभली आहेत. मात्र वारंवार होणाऱ्या या चोरीच्या घटनांमुळे व्यापारी वर्ग चिंतेत असून पोलिसांनी तातडीने कठोर पावले उचलावीत अशी मागणी जोर धरू लागली आहे.

---



# क्रीडा महोत्सवात धारणी पंचायत समितीची बाजी

## अधिकारी,कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात धारणी पंचायत समितीने आपली विजयाची परंपरा यंदाही कायम राखली. धारणी पंचायत समितीने क्रीडा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले, तर सांस्कृतिक कार्यक्रमात नांदगाव खंडेश्वर विजयी झाले. अचलपूर पंचायत समितीने उपविजेतेपद पटकावले. श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मैदानावर शनिवारी (ता.१३) सायंकाळी बक्षीस वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्य कार्यकारी अधिकार डॉ. कैलासघोडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य वित्त व लेखाधिकारी चंद्रशेखर खंडारे, पशुसंवर्धनअधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके, बांधकामचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड,शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे, गटविकास अधिकारी बाळासाहेब रायबोले, विनोद खेडकर, तेजश्री आवळे, संजय खारकर, प्रफुल्ल बोरखडे, प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, सहायक अधिकारी नीलेश तालन, गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे, संदीप बोडखे, डॉ. नितीन उंडे उपस्थित होते. यंदा प्रथमच दिव्यांग खेळाडूंसाठी थाळीफेक, गोळाफेक, भाला फेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या गटातील विजेता व उपविजेत्यांनाही सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. नितीन ठंडे यांनी, तर संचालन गजानन देशमुख यांनी केले. आभार शिक्षक बँकेचे संचालक मनीष काळे यांनी मानले.

---

# महापालिकेच्या जेसीबी ने दारू दुकान जमीनदोस्त

## आ राणा ऑन द स्पॉट दाखल होताच कारवाईचे आदेश

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** चैतन्य कॉलनीतील आदिवासी हॉस्टेलच्या,बाजूला निर्माणाधीन अवस्थेत असलेल्या देशी दारू दुकान हटविण्याबाबत चैतन्य कॉलनीसह आजूबाजूच्या अनेक कॉलनीतील महिलांचा २ वर्षापासून सुरू असलेला लढा आज संतुष्टात आला. नारीशक्ती पुढे प्रशासनाने नमते घेत. अखेर आजमनपा अतिक्रमणविभागाने ते देशीदारूचेदुकान जेसीबीने तोडून टाकले. सकाळी महिला पुरूषांचे निवेदन आल्यानंतर आ. राणांनी देखील कारवाई करण्याचे आदेश दिले होते. विशेष म्हणजे शनिवारला सायंकाळी शेकडो महिलांचा जमाव दारु दुकानावर धडकला.. सोबत तत्काळ आ. रवि राणा सुद्धा दाखल झाले.. त्यानंतर मनपाच्या जेसीबीने देशी दारुचे दुकान जमीनदोस्त केल्याने महिलांनी एकच आनंदोत्सव साजरा केला.१६ फुट अतिक्रमणात दुकानाचे काम यशोदानगर–दस्तुरनगर मार्गावर



चैतन्य कॉलनीतील मुख्य रस्त्यावर आदिवासीहॉस्टेलच्या बाजूला विजय जयस्वाल यांचेदेशी दारूचे दुकान निर्माणाधीन अवस्थेत आहे. येत्या एक, दोन महिन्यात है दुकान सुरूहोणार होते. जयस्वाल यांनी मुख्य दुकान त्यांच्या जागे बांधले. पण, ग्राहकांना दुकान सहज दिसावे म्हणून समोर १६ फुट अतिक्रमणमध्ये वेगळ्या दुकानाचे काम सुरू केले. वाशिम जिल्हयातील रिसोड येथील देशी दारू दुकानाचा परवाना जयस्वाल यांनी मंत्रालयातून मंजूर करून अमरावतीत ट्रान्सफर करून घेतला परंतु, त्या भागात आदिवासीहॉस्टेल, डोळयांचा दवाखान्या सहइत– दुकाने असून दुकानाच्या समोर व मागील बाजूने विविध कॉलनी असल्याने येथे बेवड्यांचा त्रास नको म्हणून चैतन्य कॉलनी जिवनज्योती कॉलनी, प्रभा कॉलनी, जलाराम नगर, किरण नगर परिसरातील नागरिकांचा या दुकानाला विरोध होता.

---

# 'काशिनाथ धाम' येथे आजपासून भक्तांची मांदियाळी

## संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ–** संत काशिनाथ बाबा यांच्या पुण्यतिथी महोत्सव ला आजपासून प्रारंभ होणार आहे.नाफडे पेट्रोलपंप नजीक असलेल्या काशिनाथ धाम याठिकाणी भक्तांची मांदियाळी असणारआहे.पुण्यतिथी महोत्सवा चे हे १८ वे वर्ष असून यावर्षी पहिल्यांदाच नवीन आणि प्रशस्त जागेत हा महोत्सव होत असल्याने भक्तांमध्ये आनंद आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.विदर्भासह राज्यात असलेल्या भाविक भक्तांची या महोत्सवादरम्यान दर्शनासाठी रीघ लागणार असून हजारो भाविक या पुण्यतिथी महोत्सवात सामील होणार आहे.सप्ताहामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.दररोज हभप केशवदादा उखळीकर महाराज यांच्या यांच्या सुमधुर वाणीतील संगीतमय भागवत कथेचे भाविकांसाठी आयोजन करण्यात आले आहे.काशिनाथ महाराज यांच्या भव्य मंदिरावर रोषणाई करण्यात आली असून संपूर्ण



परिसर भक्तिमय झालेला आहे. दररोज सकाळी साडे पाच वाजता काकड आरतीने या धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.सकाळी ७ ते ९ आरती व संत काशिनाथ बाबा यांची प्रार्थना .दररोज सकाळी ९ ते १२ व ३ ते ६ दरम्यान हभप केशवदादा उखळीकर महाराज यांच्या यांच्या सुमधुर वाणीतील संगीतमय भागवत कथेचे भाविकांसाठी आयोजन करण्यात आले आहे.सायंकाळी हरिपाठ आणि सामुदायिक प्रार्थना होणार आहे. भक्तमंडळी स्वयंप्रेरणेने याठिकाणी सेवा देत आहे.

### १० हजार भाविकांची व्यवस्था

नाफडे पेट्रोलपंप नजीक असलेल्या खुल्या जागेत पहिल्यांदा हा महोत्सव पार असल्यामुळे भाविकांमध्ये आनंद संचारला आहे. भाविकांनी एका दिवसात याठिकाणी मंडप उभारला असून दररोज दहा हजार भाविक कथेला उपस्थित राहू शकतील अशी व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

### २२ जानेवारीला महाप्रसाद

२२ जानेवारीला अयोध्या येथील प्राणप्रतिष्ठा सोहळा असल्याने देशभर उत्सव साजरा होणार आहे त्यामुळे संतनगरी नांदगाव पेठ येथे पुण्यतिथी महोत्सवानिमित्य महाप्रसाद वितरित होणार असल्याने भाविक भक्तांसाठी त्या दिवशी आनंदाची पर्वणीच ठरणार आहे.

---

# जिल्ह्यात संत्र्याचे भाव कोसळले



## अवघ्या १० रु किलीने विक्री

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** आंबट, गोड चवीसाठी मोर्शी,वरूड, चांदूरबाजार, अचलपूर व नरखेड काटोल यासह विदर्भातील संत्रा जगभर प्रसिद्ध आहेत. मात्र, आधीच अतिवृष्टीचा मार सहन केल्यानंतर आता बांगलादेशच्या वाढीव आयात शुल्काने नागपुरी संत्रा पुरता पिळून काढला आहे. बांगलादेशने संत्र्यावरील आयात शुल्क वाढवून प्रती किलो तब्बल ८८ रुपये केले आहे. याचा जबर फटका निर्यातीला बसला असून, यामुळे संत्र्याची उचल कमी झाली आहे. परिणामी संत्र्याचे भाव गडगडले आहेत. जानेवारी महिन्यात ४० ते ५० हजार रुपये प्रती टनाने विकल्या जाणाऱ्या संत्र्याचे भाव आता १० ते १२ हजार रुपये टनापर्यंत खाली घसरले आले आहेत.याचा मोठा आर्थिक फटका विदर्भातील संत्रा उत्पादकांना बसतो आहे. बांगलादेश येथील आयात शुल्कवाढीचा मोठा फटका विदर्भातील संत्री उत्पादक शेतकऱ्यांना बसला असल्यामुळे व्यापाऱ्यांनीही खरेदीकडे पाठ फिरविल्यामुळे बिया बहाराचा संत्रा जानेवारी महिन्यातही झाडावरच लटकलेला असल्यामुळे शेतकऱ्यांनी लावलेला खर्चही निघणे कठीण आहे.

# महायुतीच्या नेत्यांनी राणांना पकडले खिंडीत

## भूतकाळातल्या वक्तव्यांना दिला उजाळा

## महायुतीचा पहिलाच मेळावा गाजला




**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आज महायुतीच्या नेत्यांचा महत्वपूर्ण मेळावा झाला. त्यांनी आ. राणा यांना खिंडीत पकडण्याचा प्रयत्न केल्याने मेळावा चांगलाच गाजला. मेळाव्याचे निमंत्रक आ. प्रवीण पोटे , शिवसेनेचे माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी राणांवर थेट हल्ला चढविला. राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके यांनी सर्वांनी एकमताने लोकसभेचा उमेदवार ठरवावा अशी भूमिका मांडली. युवा स्वाभिमानी पार्टीचे आमदार रवी राणा यांनी मवाळ भूमिका घेत चूक झाली असल्यास माफ करण्याचे आवाहन केले.

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने राज्यात सत्तेत असणारी भाजप , सेना , राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य ११ घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये एकोपा राहावा यासाठी हा महत्वपूर्ण मेळावा आज रविवारी शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेतील संगीतसूर्य केशवराव भोसले सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. सभेच्या सुरुवातीला खा. अनिल बोंडे यांनी अबकी बार ४०० पार साठी अमरावती लोकसभेचा महायुतीचा उमेदवार विजयी करण्याचे आवाहन केले . देश बदलत असून मोदींना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीमधील घटक पक्षांनी एकी दाखविण्याचे आवाहन केले . रिपाईचे (आ) प्रकाश बनसोड यांने सन्मानाने बोलवा येवू असे म्हटले . पीरीपा नेत्याने भाजपच्या काळात खरी लोकशाही आल्याचे सांगितले.

यानंतर बैठकीत राकाँचे संजय खोडके यांनी विकासाकरिता एकत्र आहोत. मात्र सर्वांना विचारात घेवून पुढचे पाऊल उचलावे असे स्पष्ट केले. भाजपने मोठ्या भावाची भूमिका पार पाडावी. नेत्यांचे एकमत झाल्यास कार्यकर्ते कामाला लागतील. खुलपणाने बोला, समन्वय साधा असे आवाहन त्यांनी केले. प्रहारचे प्रतिनिधी मंगेश देशमुख यांनी आम्हाला दुर्लक्षित करू नका असे आवाहन केले. यानंतर आ. रवी राणा यांनी मवाळ भूमिका घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्याचे कौतुक केले. देवेंद्र फडणवीस, अमीत शहा यांचेही त्यांनी कौतुक केले. भूतकाळात चुकी झाली असल्यास क्षमा करा असे सांगून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर तोफ डागली. श्री राम मंदीराच्या लोकापर्णानंतर काँग्रेस रिकामी होणार असून उबाठासेनेत केवळ ठाकरेंसह राऊत राहणार असल्याचा दावा केला.

यानंतर शिवसेनेचे माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी जोरदार हल्लाबोल चढवित अप्रत्यक्षरित्या राणांवर शरसंधान साधले. या जागेवर शिवसेनेचा दावा आहे. आम्ही जागा मागणार आहोत. शिवसेना व भाजपची युती नैसर्गिक आहे. आम्ही सुरुवातीपासून एकत्र आहोत. उमेदवारी देतांना विचार करावा, असे ते म्हणाले. यानंतर मेळाव्याचे निमंत्रण भाजप शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांनी आ. रवी राणांवर थेट हल्ला चढविला. मला २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री केले होते. परंतु आपणास बालकमंत्री म्हटल्या गेले असे त्यांनी राणांचा नामोल्लेख टाळत म्हटले. निवडणूकीपुरती महायुती ठेवू नका. एकदिलाने एकत्र या असे सांगत प्रत्येकाला मान सन्मान दिला पाहिजे. दूधात साखर विरघळते त्याप्रमाणे मिठही विरघळत असते असा टोला लगावला. भाजपसह प्रत्येक पक्षाला विश्वासात घेवून उमेदवारी देण्यात आली पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले. एकंदरीतच आ. राणा यांना या मेळाव्यात खिंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला.

### या नेत्यांची होती उपस्थिती

उपरोक्त उल्लेखित प्रमुख नेत्यांसह प्रहारचे छोटू महाराज वसू, राकाँच्या सुरेखा ठाकरे, संतोष महात्मे, पीरिपाचे चरणदास इंगोले, ओमप्रकाश बनसोड, शिवसेना जिल्हाध्यक्ष अरूण पडोळे, गोपाल अरबट, शहराध्यक्ष संतोष बद्रे, भाजपचे जयंत डेहकर, किरण पातुरकर, शिवराय कुळकर्णी, दिनेश सूर्यवंशी, चेतन गावंडे, डॉ. नितीन धांडे, संजय नरवणे, चेतन पवार, गंगा खारकर, सतीश करेसिया, कौशीक अग्रवाल, धनराज चक्रे, ॲड. प्रशांत देशपांडे आदी उपस्थित होते.

### खासदार कोणाचा शिवसेनेचा

सध्या अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आहेत. त्यांनी कमळावर निवडणूक लढावी असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले असताना आज शिवसेनेने त्याला कलाटणी दिली.महायुतीच्या मेळाव्यानंतर शिवसैनिकांनी खासदार कुणाचा शिवसेनेचा, अशा घोषणा दिल्याने आमदार रवी राणा व युवा स्वाभिमानी पार्टी कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यांवर रंग उडाल्याचे दिसून आले

# महिला महाविद्यालयामध्ये कै. बाबासाहेब खापर्डे व्याख्यानमाला व वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – कै. बाबासाहेब खापर्डे यांनी महिलांना उच्च शिक्षण प्रदान करण्याच्या हेतुने महिला महाविदयाल याची स्थापना केली. त्यांच्या कार्याला उजाळा देण्याच्या उद्देशाने विद्यार्थिनी व अमरावतीकरांकरिता दरवर्षी कै. बाबासाहेब खापर्डे यांच्या स्मृती–प्रित्यर्थ खापर्डे व्याख्यान मालेतुन वैचारिक चळवळ चालविली जाते.नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती संचालित महिला महाविदयालयामध्ये अनेक दशकांपासून अविरतपणे सुरु असलेल्या दोनदिवसिय कै. बाबासाहेब खापर्डे व्याख्यान मालेचे आयोजन महिला महाविद्यालयाचे प्रांगण , वेळ सां. ६ वा. येथे करण्यात आले आहे. खापर्डे व्याखान मालेचे पहिले पुष्प दि. १९ जाने. २०२४ रोजी करण्यात येत आहे. याकरिता प्रमुख वक्ते. मा. मोहिनी महेश मोडक, संचालिका होरायझन वेब टेकनॉलॉजीज् . सायबर सुरक्षा आणि आपण या महत्वाच्या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सायबर क्राईम ही समस्या संपूर्ण जगात आहे ,त्यामुळे वैयक्तिक सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. हा धोका बँक आंतरराष्ट्रीय कंपन्या, संस्था तसेच व्यक्ती यांना देखिल आहे, त्यामुळे सायबर सुरक्षा ही आजच्या काळाची गरज आहे. अश्या अत्यंत संवेदनशील महत्वाच्या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, या कार्यक्रमाकरिता नू. वि. शि.मंडळाच्या मा. अध्यक्ष डॉ. मायाताई शिराळकर ह्या अध्यक्षस्थानी राहतील तसेच प्रमुख उपस्थिती मा. विलास मराठे , संपादक दैनिक हिंदुस्थान हे उपस्थित राहणार आहेत.द्वितिय पुष्प २० जाने २०२४ रोजी आयोजित करण्यात आले असून त्या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री सतिश मोहन फडके , संचालक फडके अॅक्डमी अकोला हे उपस्थित राहणार आहेत. भरकटणाऱ्या संस्कृतीची दिशा या विषयावर मार्गदर्शन करतील. प्रत्येकाला विचार करावयास लावणारा हा विषय आहे . या कार्यक्रमाला नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे जेष्ठ उपाअध्यक्ष मा.डॉ. सुभाष कसबेकर अध्यक्षस्थान भूषवतिल. तसेच या कार्यक्रमाकरिता अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव मा. डॉ. तुषार देशमुख उपस्थित राहणार आहेत तसेच , नू. वि. शि.मंडळाचे उपाध्यक्ष मा. पंडीत किशोर नवसाळकर, नू. वि. शि. मंडळाचे उपाध्यक्ष मा. व्हि. डी जोशी तसेच संस्थेचे मा. सचिव श्री. निनाद सोमण व समस्त सन्माननिय कार्यकारणी उपस्थित राहणार आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील स्नेहसंमेलनाचे आयोजन दिनांक १९ व २० जानेवारी २०२४ रोजी करण्यात येणार असून या द्विदिवशीय वार्षिक संमेलनाचे उदघाटन ह.व्या. प्र. मंडळाच्या सचिव मा. डॉ. माधुरी चेंडके यांच्या हस्ते होईल . या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नू. वि. शि.मंडळाच्या मा. अध्यक्ष डॉ. मायाताई शिराळकर ह्या भूषवतील.

विद्यार्थिनींच्या सुप्त कला गुणांना वाव मिळण्यासाठी अनेक स्पर्धांचे व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवस चालणाऱ्या कै. बाबासाहेब खापर्डे व्याख्यानमालेस जाणकार श्रोत्यांनी अधिकाधिक संख्येने उपस्थित राहून व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील तसेच खापर्डे व्याख्यान समिती व स्नेहसंमेलन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे .

# विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ काढला गावाबाहेर

## रायपुर वासी म्हणाले पहिले विकास नंतर प्रचार



**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली कामे ,केंद्र सरकारने केलेली कामे यांची माहिती देण्यासाठी राज्यभरात फिरणाऱ्या विकसित भारत संकल्प यात्रेला महाराष्ट्रातील अनेक ठिकानाहून विरोध होत असल्याचे दिसत आहे . असाच विरोध मेळघाटातील अतिदुर्गम भाग असल्येल्या ,घनदाट जंगलात,दर्याखोर्यात वसलेल्या आदिवासी गाव रायपुर येथे दिसला. ८ जानेवारी रोजी रायपुर या गावात विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ दाखल होताच गावकरी यांनी या रथला बाहेर काढला .त्यामुळे रथासोबत आलेल्या यंत्रणेची चांगलीच तारांबळ उड़ाली आहे. गावकर्यांचा म्हणने आहे की अजुन पर्यंत आमच्या मेलघाट मध्ये रस्ता नाही,वीज नाही,रोजगार नाही,चांगल शिक्षण नाही ,चांगली आरोग्य सेवा नाही कुपोषण ,मातामृत्यु,बालमृत्यु होतच आहे.आतापर्यंत आदिवासी समाजाचा विकास झाला नाही,कोणत्याच प्रकारचा सोईसुविधा अजुन पर्यंत आमच्या पर्यंत पोहचले नाही ,भारत देश स्वतंत्र तर झाला पण आजही आमच्या मेलघाट मधील आदिवासी भागातील स्थिति ब्रिटिशकाळ मध्ये जे जीवन जगत होते त्या पेक्षाही वाईट परिस्थिती आज आमच्या गावाची आहे ,आतापर्यंत आमचा कशलाही विकास झाला नाही.फक्त मेलघाटच्या नावातून अनेक संस्था ,छ्त्रब्ज पैसे कमवत आहे . स्थिती जैसे थी वैसे म्हणून चिखलदरा तालुक्यातील रायपुर गावातील आदिवासी युवकांनी विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ ला गावाबाहेर काढून सरकार विरूद्ध आपल्या वेदना व्यक्त केल्या. विकसित भारत संकल्प यात्रेचा रथवर *मोदी सरकारची हमी* हे शब्द लिहलेले असल्यामुळे आदिवासी युवक यांनी विरोध केले असल्याचे देखील म्हटले आहे.या योजना भारत सरकारचा आहेत की मोदी सरकारचा ,अस म्हणत रायपुर येथील गावकरी या यात्रेला विरोध करत असल्याचे समोर आले आहे.गावकरी यांनी म्हटले की शाशनाच्या पैसातून कोणत्याही पक्षाचा प्रचार चालणार नाही सरकारी योजनेचा लाभ पोहचविण्याकरीता हि यात्रा काढली आहे ,मग त्यावर भारत सरकार एवजी मोदी सरकार अस का लिहिन्यात आल? या प्रचारात भारताचा एकही झंडा दिसत नाही? हेच सांगण्यासाठी तुम्ही इथे आलय का ? हे प्रश्न जेव्हा आदिवासी युवकांनी शाशकीय अधिकारी यांना विचारल्या नंतर ते अधिकारी पण निरुत्तर झाल्याचे दिसले. भारताच्या पहिल्या कलमानुसार *India That Is Bharat* अस म्हटलय. मग भारत सरकार एवजी मोदी सरकार असा प्रचार केला तर त्यामुळे आपल्या देशाचा सार्वभौमत्वाचे प्रश्न निर्माण होऊ शकतो याचा विचार करा, आणी सर्वात पहिले खरच आदिवासी भागातील विकास करा ,सर्व सोयीसुविधा उपलब्ध करा ,चांगले आरोग्य ,शिक्षण ,रस्ता,वीज , आणी अश्या लहान लहान जे समस्या आहे ते पूर्ण करा ,नंतर आमच्या गावात या ,नाहीतर नुस्त पोकळ घोषणाबाजी,प्रचार करून आम्हाला खोटे स्वप्न दाखऊ नका, अशे बोल गावकारी यांनी आलेल्या अधिकारी यांना बोलून त्यांचा वेदना ,समस्या,व्यक्त करून सरकार विरूद्ध नाराजी व्यक्त केली .

# महायुतीच्या बैठकीकडे बच्चू कडूंची पाठ

## भाजपविरोधात उघडला मोर्चा, कठोर टीका



**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – एकीकडे शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये काँग्रेसमधून इनकमिंग होत असताना महायुतीमध्ये धुसफुस सुरु आहे. आज होणाऱ्या महायुतीच्या बैठकीला आमदार बच्चू कडू जाणार नाहीत. तर महायुतीच्या पत्रकार परिषदेसाठी काही तास आधी फोन केल्याने प्रहार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

आज होणाऱ्या महायुतीच्या बैठकीला आमदार बच्चू कडू जाणार नाही. ग्रामपंचायत व नगरपंचायतला भाजपने निधी दिला नाही. भाजपला लोकसभा महत्त्वाची तर आम्हाला विधानसभा महत्त्वाची, तर आमच्याही मागण्या आहेत. त्या पूर्ण कराव्यात. वापरून घेण्याची भाषा भाजपने करू नये. ५ फेब्रुवारी रोजी राज्यभरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यात भूमिका जाहीर करू, असा उघड पवित्रात बच्चू कडु यांनी भाजपविरोधात घेतला आहे. तर मागील ४ वर्षात आम्हाला एकदाही प्रहार पक्ष हा महायुतीचा घटक पक्ष असल्याचे जाणवले नाही. एकदाही प्रहारच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना महायुतीतील नेत्यांनी विचारात घेतले नाही किंबहुना संपर्क साधला नाही. कालच्या महायुतीच्या पत्रकार परिषदेचे नियोजन चार ते पाच दिवसांपूर्वी झाले असताना आम्हाला पत्रकार परिषदेच्या काही तास अगोदर फोन करण्यात आला, अशा शब्दांत प्रहार पक्षाचे भंडारा जिल्हाप्रमुख अंकुश वंजारी यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्र राज्यातून सिटी ई गव्हर्नन्स सर्व्हे मधे अमरावती महानगरपालिकेने मिळविला पाचवा क्रमांक

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – भारत सरकार व राज्य सरकारचे ई–गव्हर्नन्स धोरण युनायटेड नेशनचे ई–गव्हर्नन्स अहवाल यांचा अभ्यास करून दरवर्षी ई–गव्हर्नन्स इंडेक्सचे निकष ठरविण्यात येतात.

राज्यातील महानगरपालिकांचा ई–गव्हर्नन्स निर्देशांकात अमरावती महानगरपालिकेने राज्यात पाचवे स्थान मिळविले आहे. विशेष म्हणजे नवी मुंबई, कल्याण–डोंबिवली, मीरा–भाईंदर, नाशिक, सोलापूर आणि नागपूर या महानगरपालिकांना सुद्धा मागे सोडले आहे. पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन(झठज) तर्फे महानगरपालिकांचा ई–गव्हर्नन्सच्या सद्यस्थितीबाबत अभ्यास करण्यासाठी हा निर्देशांक तयार केला आहे. आयुक्त महानगरपालिका यांनी याबाबत सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे व त्यांचे संपूर्ण चमूचे संगणक विभागाचे कौतुक केले आहे. तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या सेवा पारदर्शक रित्या



जलद गतीने पुढेही देण्याकरिता अमरावती महानगरपालिका प्रयत्नरत राहील असा विश्वास दर्शविला आहे.

ई–गव्हर्नन्स मध्ये काय प्रगती व अधोगती झाली आहे याची माहिती नागरिकांना मिळू शकेल हा निर्देशांकhttp://e-governance.info/या संकेतस्थळावर सर्वांना बघता येईल तसेच डाऊनलोडही करता येईल निर्देशांकाचे निकष सेवा पारदर्शकता उपलब्धता आणि ई–गव्हर्नन्स मोबाईल अॅप सोशल मीडिया आणि अधिकृत संकेतस्थळ यावर जाहीर केलेली माहिती आहे.

# राज्यात बिबट्यांची संख्या वाढली; अधिवासासाठी जंगल अपुरे, आता शहराकडे धाव

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – : राज्यात चांद्यापासून तर बांध्यापर्यंत जंगल अथवा नागरीवस्तीत सहजतेने बिबट आढळत असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. हल्ली बिबट्यांची संख्या १६९० ईतकी नोंद झाली असून त्यांना अधिवासासाठी जंगल अपुरे ठरत आहे. परिणामी शिकार किंवा अन्नाच्या भटकंतीसाठी बिबट्यांनी शहराकडे धाव घेतल्याचे वास्तव आहे.



राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, राज्यात बिबट्यांची संख्या १६९० इतकी झाल्याची नोंद आहे. त्यात राखीव जंगलाच्या बाहेरील बिबट्याचा समावेश नाही. मात्र नैसर्गिक, रस्ते, रेल्वे अपघात, विहिरीत पडून, शिकार, विजेच्या प्रवाहासह इतर कारणांमुळे सन २०११ ते २०२१ या दरम्यान गत दहा वर्षात ८६२ बिबट्यांचा मृत्यू झाल्याची बाब चिंता वाढवणारी आहे. विशेषत: २०२० मध्ये सर्वाधिक १७२ बिबट्यांचे मृत्यू झाले आहेत. ८६२ बिबट्याच्या मृत्युपैकी ८८ घटना शिकारीच्या २८ घटना विजेचा धक्का लागून, १३ विषबाधा तर २७ बिबटे सापळा आणि फासमध्ये अडकून असे एकूण १५६ घटना शिकार व शिकारजन्य कारणामुळे घडलेल्या आहेत. तर बिबट्यांच्या मृत्यूचे प्रमाण हे ४३ टक्के इतके आहे. राज्य वन्यजीव अपराध नियंत्रण ब्यूरो स्थापन झाल्यास हा आकडा अतिशय कमी प्रमाणावर आणता येऊ शकतो, असा अहवाल राज्याच्या वन्यजीव विभागाने केंद्र शासनाला डिसेंबर २०२३ मध्ये पाठविला आहे.

बिबट्याचा नैसर्गिक स्वभाव, वर्तणूक, बदलणाऱ्या परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता व मोठ्या प्रमाणातील प्रजोत्पादनामुळे बिबट्यांच्या संख्या वाढत आहेत. बिबट्यांचा मुक्त संचार सर्वच क्षेत्रात असल्याने राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि जिल्हा मार्गावरही त्याचा मृत्यूच्या घटना घडतात. या कारणामुळेच मानव– बिबट्यांचा संघर्ष वाढतो आणि बिबट्यांचे मृत्यू व मानवहानीच्या घटण्यामध्ये वाढ झाली आहे.

– **यादव तरटे पाटील,** वन्यजीव अभ्यासक अमरावती.

### नागपूर हिवाळी अधिवेशनातही गाजला बिबट

अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या परिसरात ऑक्टोंबर ते डिसेंबर या कालावधीत बिबट ठिय्या मांडून होता.त्याच्यापासून नागरिकांना धोका होऊ नये, यासाठी पोलिस आणि वन विभागाची चमू सुरक्षिततेसाठी तैनात होती. मात्र, हा बिबट जेरबंद करावा म्हणून आमदार सुलभा खोडके यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात लक्षवेधीद्वारे सभागृहाचे लक्ष वेधले होते. अखेर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बिबट जेरबंद करावा, असे आदेश दिले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी हा बिबट जेरबंद करून मेळघाटच्या जंगलात सोडण्यात आले. तब्बल अडीच महिन्यानंतर अमरावतीकरांना बिबट्यापासून सुटका मिळाली, हे विशेष.

## पाहिजेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क– prajasattaknews24gmail.com

# विद्यार्थ्यांनो मातीचे ऋण विसरु नका यशोमती ठाकूर यांचा सल्ला

## अंतोरा येथील विद्यार्थ्यांना स्कूलबॅग, शिष्यवृत्तीचे वाटप

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ज्या मातीत आपला जन्म झाला, शिकलो, त्या मातीचे ऋण कदापी विसरू नका. समाजाला आपण देणे लागतो, याची जाण ठेवा. ससाने कुटूंबियांनी याच जाणिवेतून गावातील विद्यार्थ्यांना केलेली मदत अत्यंत बहुमोल आहे. त्यापासून प्रेरणा घेवून विद्यार्थ्यांनी आयुष्याची दिशा ठरवावी, असे प्रतिपादन आ.यशोमती ठाकूर यांनी केले.नजीकच्या अंतोरा येथील जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांना स्कूलबॅग वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी विविध दाखले देवून आ.ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.स्व.देवराव ससाने व स्व.कमलाबाई ससाने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटूंबियांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शिष्यवृत्ती वाटपाचा निर्णय घेवून त्याची तत्काळ अंमलबजावणीही केली. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाला आ.ठाकूर यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानदसचिव सुमित वानखेडे,मृद व जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता विजय देवराज, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी नितिन दुसाणे, अधीक्षक अभियंता भूषण हर्षे,श्रीकांत दळवी, निपाणे,श्रीकांत मस्कावार, अतुल गायगोले, दिलीप सोनोने, युवा उद्योजक



स्वप्नील उर्फ भैय्यासाहेब रामेकर,सरपंचा श्रीमती बडे,उपसरपंच उमेश बारबुध्दे आदी उपस्थित होते. याप्रसंगी विजय देवराज, सुमित वानखेडे यांनीही समोयोचित विचार व्यक्त केले. प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक उपविभागीय जलसंधारण अधिकारी सुदेश ससाने यांनी करीत कार्यक्रमामागची भूमिका मांडली. संचालन प्रिया बारबुध्दे, तर आभार प्रदर्शन दिलीप तायडे यांनी केले.कार्यक्रमाला पुंडलिकराव ससाने,यमुनाताई ससाने,प्रमिलाताई ससाने, शांताबाई मोहोड,ताराबाई विश्वासराव तायडे,लताबाई तायडे,चित्राताई गवई, सरिता सरोदे,रवी ससाने,विष्णु ससाने,मंदाताई गाडे,विजया थोरात,संगीता तायडे,सुजिता वानखडे, वंदना ससाने, शोभाताई ससाने,प्रा.डॉ.सौ.विद्या ससाने, सुनिल तायडे, निळकंठ वानखडे, गोपिचंद गवई,शरद माकोडे, रोहित अग्रवाल,प्रवीण निंभोरकर,राजेंद्र चौधरी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.याच कार्यक्रमात अंतोरा येथीलच कु.प्रतीक्षा धनराज ससाने व कु.पूजा प्रेमदास ससाने या महाविद्यालय विद्यार्थिनींना पुढील शिक्षणासाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांची मदत आ.ठाकूर यांच्याहस्ते देण्यात आली.सोबतच जि. प. शाळेतील ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना स्कूलबॅगचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दरवर्षी गावातील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग तसेच इतर शालेय साहित्याचे वाटप सुदेश ससाने व त्यांच्या कुटूंबियातर्फे करण्यात येते, हे उल्लेखनीय.

# मॉर्निंग चषकाचे माध्यमातून नवोदित खेळाडूंना मोठी संधी : आमदार सुलभाताई खोडके

## अंतिम फेरीत सान्नि अकोला संघ ठरला प्रथम पारितोषिकाचा मानकरी

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दर्जेदार खेळासाठी आव्हाने कितीही असली तरी ती स्वीकारीत सर्वोत्कृष्ट नैसर्गिक खेळाचे प्रदर्शनाद्वारे सांघिक कामगिरीतून विजय मिळवून देणे आवश्यक असते. क्रिकेट या खेळात एकदा अपेक्षांचे ओझे आणि चांगली कामगिरी करण्याचे दडपण असले तरी अष्टपैलू कामगिरीतून विजयश्री साकारणे हे महत्त्वाचे आहे. याचा प्रत्यय या सामन्यात वेळोवेळी दिसून आला आहे. नवोदित खेळाडू आपली क्षमता सिद्ध करत असले तरीही त्यांना आपली उपयुक्तता दाखविण्यासाठी अनुभवी खेळाडूंचे मार्गदर्शन सदैव प्रेरणादायी ठरू पाहत आहे. कामगिरीत सातत्य राखण्यासाठी खेळाडूंनी फिटनेस व क्षेत्ररक्षणावर भर देणे गरजेचे आहे.क्रीडा स्पर्धेत यश मिळविणाऱ्या व सहभागी झालेल्या खेळाडूंचा अभिमान वाटतो. त्यांच्या कामगिरीने राज्याचा गौरव उंचावला आहे. भविष्यात या कामगिरीत निश्चितच प्रगती होईल. अशी आशा व्यक्त करीत या सामन्यांमध्ये सहभागी सर्व खेळाडूंचे आपण अभिनंदन करतो. अंतिम सामन्यात विजेता



व उपविजेता संघांनी आपल्या कामगिरीचा अमिट ठसा उमटविला आहे. नवोदित खेळाडूंसाठी मॉर्निंग चषक मध्ये सहभाग ही त्यांच्यासाठी मोठी संधी आहे. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये आपली छाप सोडणाऱ्या खेळाडूंपासून प्रेरणा घेऊन त्यांचा वारसा पुढे नेण्याची जवाबदारी युवा पिढीवर आहे.आव्हानात्मक परिस्थितीत मोठी खेळी करण्याचे लक्ष्य राखीत नेत्रदीपक कामगिरीसाठी सकारात्मकता बाळगणे सुद्धा आवश्यक असते, हे मात्र विसरून चालणार नाही. प्रत्येक सामन्यात खेळतांना मर्यादित षटकांतील कामगिरी सुधारण्यासह विजयी लय कायम राखण्यावर संघातील प्रत्येक सदस्यांनी भर देणे गरजेचे आहे.आव्हान अत्यंत कठीण असले,तरी अशक्य अजिबात नाही. हा ध्यास मनी बाळगून प्रत्येक खेळाडूंनी आपल्या सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन केल्यास विजयी लक्ष्य गाठणे सुलभ व शक्य होते. असे प्रतिपादन आमदार-सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी मॉर्निंग चषक २०२३-२४ भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामने बक्षीस वितरण समारंभात उपस्थितांना संबोधून केले. रविवार दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती वर्षानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय वा. मो.उपाख्य दादासाहेब काळमेघ व स्वर्गीय प्रशांत उर्फ गोटूभाऊ चांदूरकर स्मृती प्रित्यर्थ मॉर्निंग चषक २०२३-२४ भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामने बक्षीस वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य-हेमंतभाऊ काळमेघ, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय प्राचार्य डॉ स्मिता देशमुख, शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक-प्रा. विलास ठाकरे,बालरोग तज्ञ-डॉ. भुपेश भोंड,मनोज चांदूरकर,डॉ. अक्षय ढेवले आदी उपस्थित होते. यावेळी संदीप उर्फ पिंटू देशमुख यांनी आमदार-सौ. सुलभाताई खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तर अन्य अतिथी मान्यवरांचे सतीश उर्फ गुड्डू ढोरे,रवीभाऊ गणेशपुरे, प्रमोद बोरकर, मिलिंद पुंड यांनी यथोचित स्वागत केले.याप्रसंगी नर्मदा सायकल परिक्रमा बद्दल शशिकांत ठवळी यांचा आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते शाल-श्रीफळ-पुष्पगुच्छ-स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.अमरावती येथे पंचवटी चौक परिसर स्थित रूरल इन्स्टिट्यूट क्रीडांगण येथे ४ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२४ दरम्यान लीग पध्दतीने १० षटकांच्या भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. अमरावती, अकोला,वाशीम,बुलढाणा, यवतमाळ,अहमदनगर येथिल टीम सहभागी झाल्या होत्या.या स्पर्धेत एकूण २४ चमुंनी सहभाग होता. रविवारी झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात अकोला येथील सान्नि टीमने बुलढाणा येथील ताज इंडियाच्या संघाला पराजित करून विजय संपादन करीत जेतेपद पटकाविले होते. याप्रसंगी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल सान्नि-अकोला संघाला १ लक्ष रुपये पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले.

# श्रीक्षेत्र नागरवाडी येथे आ.बच्चु कडू यांच्या हस्ते भक्तनिवास व सभागृहाचे लोकार्पण

## गोपाला गोपाल देवकी नंदन गोपालाच्या गजरात दुमदुमली नागरवाडी इंद्रभुवन नगरी

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक चांदुरबाजार**

कर्मयोगी संत गाडगेबाबांचे अंतिम श्रध्दास्थान असलेल्या, श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे, लोकप्रिय आ.बच्चुभाऊ कडू यांच्या विशेष प्रयत्नातून यात्रेकरु व भाविकभक्तांच्या सोयीकरीता नव्याने उभारण्यात आलेल्या, भक्तनिवासाचा दिमाखदार असा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात या ठिकाणी पार पडला.

याप्रसंगी नागरवाडी इंद्रभुवानाचे शिल्पकार संचालक बापूसाहेब देशमुख यांच्या समवेत आश्रमशाळेतील विद्यार्थी तसेच कार्यक्रमाला उपस्थित भजनी मंडळींनी ढोलताशे व हरिनामाच्या गजरात आ.बच्चु कडू समवेत सोहळ्याला उपस्थित मान्यवरांचे हृदयस्पर्शी असे स्वागत केले.

यावेळी आ.बच्चुभाऊ कडू यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या मुर्तीचे पुजन व माल्यार्पण करत श्री गाडगेबाबांचे निष्ठावान सेवक स्व.अच्युतराव उर्फ दादासाहेब देशमुख यांचा स्मृती दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले. यानंतर प्रामुख्याने यात्रेकरु व भाविकभक्तांच्या सोयीकरीता नव्याने उभारण्यात आलेल्या सुंदर अशा भक्तनिवासाचे लोकार्पण आ.कडू यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. वैराग्यमुर्ती गाडगेबाबांचे अंतिम श्रध्दास्थानअसलेल्या नागरवाडी इंद्रभुवनातून संत गाडगेबाबांचे विचार व महाराष्ट्रातील शिक्षणाचे प्रमुख केंद्र निर्माण करणार असल्याच महत्वपुर्ण प्रतिपादन आ.बच्चु कडू यांनी यावेळी केल. दरम्यान संस्थेचे सर्वेसर्वा बापुसाहेब देशमुख यांनी या आनंदनय सोहळ्याला उपस्थित सर्व मान्यवरांचे यावेळी आभार मानले.या श्रृंखलेत मुंबई येथिल दानशुर नितीनजी दळवी यांच्या संकल्पनेतून, गेल्या अनेक वर्षापासुन कर्मयोगी गाडगेबाबांच्या सेवाकार्यात आपले महत्वपुर्ण योगदान देणाऱ्या सेवकांना सुंदर भेट वस्तु देत त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.सरतेशेवटी या आनंदमय सोहळ्याला उपस्थित भजनी मंडळी व विद्यार्थ्यांना सुंदर ब्लँकेट्स व मिठाईचे वितरण करण्यात आले.सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेत या कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाला दानवीर नितीन दळवी,रामेश्वर मालपाणी,सुखदेव भुतडा,जीवन जवंजाळ, प्रहार शेतकरी संघटनेचे प्रमुख मंगेश देशमुख, प्रा.अरविंद देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कृणाल पिंजरकर,मिलींद भेंडे,मंगेश खराड,कंत्राटदार सुधीर जाधव,संचालक सागर देशमुख, गजानन देशमुख, कुणाल देशमुख, प्रकाश महात्मे, गजानन जवंजाळ, माजी मुख्याध्यापक किशोर चौधरी,माजी आदर्श शिक्षक अरुण पवार,तसेच संस्थेचे पदाधिकारी व परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राजस्थानी हितकारक महिला मंडळातर्फे मुमुक्षु हितेश कांकरिया यांचे स्वागत

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक धामणगांव रेल्वे**

धामणगांव तालुक्याच्या इतिहासात प्रथमच जैनधर्माची दीक्षा स्वीकारणारे युवा वैरागी मुमुक्षु हितेश कांकरिया यांचे स्वागत राजस्थानी हितकारक महिला मंडळा तर्फे स्थानीक पसारी धर्मशाळेत करण्यात आले.

सुरूवातीला जैनमंदिरा पासून पसारी धर्मशाळे पर्यंत प्रचंड जयघोषात शोभायात्रा काढण्यात आली.याप्रसंगी स्वागत गीत अर्चना वर्मा व मधु जांगड़ा यानी सादर केले.युवा वैरागी मुमुक्षु हितेश कांकरिया*यांच्या समवेत त्याचे आई वडील डॉ. हेमकरण कांकरिया व उषा कांकरिया यांचे स्वागत राजस्थानी हितकारक महिला मंडळा तर्फे अध्यक्षा राधा भूत व सचिव जयश्री राठी व चंचल शर्मा यानी केले.या प्रसंगी



भक्ति नृत्याचे सादरीकरण कृर्ती राजेश कुचेरिया , तबला वादन राधेश गोपाल भूत , हॉर्मोनियम वादन नीलय सतीश बूब यानी केले.आपल्या स्वागताला उत्तर देताना मुमुक्षु हितेश कांकरिया यांनी मानवी जीवनात सांसारिक मोहात न पड़ता आध्यात्मिक ते कड़े ओढ़ लावण्याचे महत्व प्रतिपादित केले.स्वागत, सत्कार या क्षणिक आनंदाच्या गोष्टी असून भक्तिपंथ हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असायला पाहिजे असे सांगितले.माझी भागवती दीक्षा २२ जानेवारीला माझे धर्मगुरू श्री रामलाल यांचा मार्गदर्शनात होत असून २२ जानेवारीलाच अयोध्या येथे प्रभु श्रीरामाच्या मूर्तिची प्राण प्रतिष्ठा होत आहे व माझ्या गुरुचे नाव सुद्धा रामलाल आहे हा एक सुखद योगायोग व दुग्धशर्करायोग येत असल्याचे त्यांनी सांगितले.त्यानी पुढे बोलताना म्हटले की आपले आशीर्वादच माझ्या वैराग्य संयमी जीवनाची भेंट राहिल. कार्यक्रमाचे संचालन सारिका पनपालिया व आभार प्रदर्शन नीता मूंधड़ा यांनी केले या प्रसंगी राजस्थानी हितकारक महिला मंडळाच्या सदस्या मोठया संख्येने उपस्थित होत्या.

# रस्ता सुरक्षा अभियान २०२४ चे उद्याला उद्घाटन

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

रस्ता सुरक्षा अभियान २०२४ चे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते मंगळवावर दि.१६ जानेवारी रोजी उद्घाटन होणार आहे.जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रस्ता सुरक्षा अभियान २०२४ ला मंगळवार दि.१६ जानेवारी पासून प्रारंभ होणार आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या शुभहस्ते मंगळवारी सकाळी १० वाजता प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभागृहात अभियानाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमामध्ये पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद सिंगुरी, प्रादेशिक परिवहन अधिकारी राजाभाऊ गीते यांची प्रमूख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहनउपप्रादेशिक परिवहन अधिकारी राज बागरी व सिद्धार्थ ठोके यांनी केले आहे.

